| MHBI170001512019 | **<u>फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१५/२०१९</u>**<br>**<u>नि. १ खालील आदेश</u>** |
|---|---|

प्रस्तुत प्रकरण हे फौजदारी प्रक्रिया संहिता चे कलम १२५ च्या तरतुदीं अंतर्गत पोटगी मिळण्याकरीता दाखल केलेले आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने **रजनेश वि. नेहा** (Criminal Appeal No. 730/2020//Date Of Judgment 04.11.2020) या निवाड्यात अशा प्रकारच्या प्रकरणात अंतरीम तसेच अंतिम पोटगीची रक्कम ठरविण्याकरीता पक्षकारांकडून कोणकोणती पुर्तता करणे आवश्यक आहे याबाबत सविस्तर निर्देश दिलेले आहेत. उभय पक्षकारांनी पोटगी अर्जावर सुनावणी होण्यापुर्वी Enclosure I & II नमुन्यामध्ये मालमत्ता व दायित्व प्रकटीकरण शपथपत्र (Affidavit Disclosure Of Assets And Liabilities) हे ठराविक कालावधीत दाखल करण्याचे निर्देश संबंधित न्यायालयाने देणे या निर्देशाचा त्यामध्ये समावेश आहे. त्याप्रमाणे या प्रकरणात देखील पुर्तता होणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरण हे न्यायनिर्णयाकरीता नेमण्यात आलेले आहे, परंतु अर्जदार तसेच गैरअर्जदार यांनी त्यांचे शपथपत्र अद्यापपर्यंत दाखल केलेले नाही. सबब, अर्जदार क्र.१ आणि गैरअर्जदार यांस याद्वारे निर्देशित करण्यात येते की, वर नमुद निवाड्यामधील निर्देशांप्रमाणे त्यांनी स्वतःचे Enclosure I & II या नमुन्यामध्ये (त्यांना जे लागू असेल ते) मालमत्ता व दायित्व प्रकटीकरण शपथपत्र (Affidavit Disclosure Of Assets And Liabilities) पुढील तारखेपर्यंत दाखल करावेत.

या आदेशाची प्रत उभय पक्षकारांना, त्यांनी मागणी केल्यास, विनाशुल्क द्यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by VISHNU DATTARAO GITE
Date: 2026.03.23 11:01:19 +0530

**दिनांक– १८/०३/२०२६.** **(विष्णु द. गिते)**
**वडवणी.** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, वडवणी.**

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. विष्णु द. गिते,**<br>दि. न्या. क. स्तर तथा<br>न्यायदंडाधिकारी वर्ग–१, वडवणी,<br>जि. बीड. |
| लघुलेखकाचे नाव | :– | राजेश आर. कुलकर्णी |
| घोषित दिनांक | :– | १८/०३/२०२६. |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | १८/०३/२०२६. |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | १८/०३/२०२६. |